# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री विषयक विचार

**Asst. Prof. Onkar Ankush Korwale**

*Progressive Education Society's*

*Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar, Pune – 411005*

---

मराठी साहित्याच्या क्षेत्रात अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वेगळ्या वळणाचे व वेगळ्या ढंगाचे आहे. हे साहित्य मानवी मनाला ओढ लावते, उत्सुकता निर्माण करीत परिणाम साधते. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या जशा पुरूषप्रधान आहेत तशा स्त्रीप्रधानही आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांमधील नायिका कथेला व्यापून टाकतात. या साहित्यांमधील स्त्री नायिका स्पष्ट व रोखठोक प्रश्न विचारून घायाळही करतात. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांमधील स्त्रीपात्र ही मनस्वी जीवन जगणारी आहेत. मनस्वी असली तरी समाजाच्या सर्वोच्च स्तरावर बसून, मनस्वीपणे चैन करण्यास मोकळीक असणाऱ्या प्रवृत्तीची नाहीत. समाजातील बंधने तिच्यावर आहेत. स्वतःच्या स्वातंत्र्याकरिता व अस्मितेसाठी ती जबरदस्त झगडणारी व विजय मिळविणारी आहेत. जीवन जगण्याच्या अधिकाराची पायमल्ली होताच ती खवळून उठते, पेटून उठते व रणांगणात लढावे तशी ती लढते. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांमधली स्त्री वाचल्यानंतर स्त्रीचे महत्त्व, अस्मिता व स्वातंत्र्यासाठी लिहिणारा हा लेखक बघून मन भारावून जातं, थक्क होतं. या नायिकांमध्ये मंगला, वैजयंता, आवडी, चित्रा, आबी, रत्ना, सीता या मन वेधून घेतात.

अण्णा भाऊ साठे यांची एक शाहीर, नाटककार, कादंबरीकार, कथाकार, कलावंत अशा विविध नावांनी ओळख असली तरी अण्णा भाऊ साठे हे मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात श्रेष्ठ दर्जाचे कथाकार म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कथा जगातल्या अनेक भाषांत भाषांतरीत झाल्याने ते जागतिक दर्जाचे कथाकार बनले आहेत. १९४९ ते १९६९ हा अण्णाभाऊंचा कथालेखनाचा काळ आहे. १९४९ साली 'मशाल' या साप्ताहिकातून त्यांची पहिली कथा माझी दिवाळी' ही मानली जाते. अण्णाभाऊंचा पहिला कथासंग्रह 'खुळंवाडी' १९५७ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर मात्र अण्णाभाऊंनी एकानंतर एक अशा अनेक कथा लिहून कथांचा अक्षरशः पाऊसच पाडला. अण्णाभाऊंच्या कथा साता समुद्रापलीकडे जाऊन पोहचल्या आहेत.

त्यांच्या कथांचे हिंदी, सिंधी, बंगाली, गुजराथी, मल्याळी, जर्मन, झेक, इंग्रजी, पोलीश, रशियन, स्लोव्हाक इत्यादी देशी-विदेशी भाषेत भाषांतरे झाली आहेत. अण्णाभाऊंची कथा ही जात-पात, वर्ण-ध्म, पंथ, भाषा, प्रांत, देश आणि सीमा या सगळ्याच्या मर्यादा तोडून विश्वव्यापकत्वाचा मान मिळवत. अण्णाभाऊंचा बरबाद्या कंजारी, भोमक्या, सुलतान, मकुल मुलाणी, निळू मांग, सावळा मांग. बब-्या.

मारूत्या. फला. गीता. काशी. निल्ली, नसरू, दादा न्हावी इ. या कथांमधील पात्रांनी जगभरातल्या वाचकाला अंर्तमुख करून सोडले आहे.

अण्णाभाऊंच्या नावावर जवळपास एकूण वीस कथासंग्रह प्रकाशित आहेत. खुळंवाडी - १९५७, बरबाद्या कंजारी - १९६०, कृष्णाकाठच्या कथा - १९६२, आबी, भानामती, लाडी, फरारी, गजाआड, चिरागनगरची भुतं, गुऱ्हाळ, जिवंत काडतूस, ठासलेल्या बंदुका, नवती, निखारा, भुताचा मळा, रानवेली, राम-रावण युद्ध कथा, भोमक्या, वणव्याची काडी, सातारी काडतूस हे ते कथासंग्रह होत. अण्णाभाऊंच्या उपलब्ध कथासंग्रहावर प्रथमावृत्तीचा प्रकाशन काल स्पष्ट असेल तेवढाच संग्रहासमोर दिला आहे. इतर सर्व संग्रह १९६२ ते १९६९ या काळात प्रकाशित झाले आहेत.

अण्णा भाऊ आपल्या लेखनाविषयी म्हणतात, 'माझी जीवनावर फार निष्ठा असून, मला माणसं आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात व जगाला जगवतात. त्यांच्यावरच हे जग चालतं. त्यांची झुंज, नि त्यांचं यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रूप करणं मला आवडत नाही, नव्हे मला भीती वाटते किंवा मी लिहिताना सदैव सहानुभूतीनं लिहिण्याचा प्रयत्न करतो. ज्यांच्याविषयी मी लिहितो, ती माझी माणसं असतात,' हे वाचल्यानंतर स्त्री कादंबरीचा शेवट दुःखद होतच नाही, हे दिसते.

'वारणेच्या खोऱ्या'मधील मंगला ही एक वीरांगणा आहे. ती एक क्रांतिकारी मराठी स्त्री आहे. आईबापाची ती लाडकी आहे. वाणानं व गुणानं ती गावात उजवी आहे. तिचा भाऊ तिचे लग्न नागोजीसोबत ठरवून येतो पण तो देशद्रोही असतो, म्हणून ती त्यास ठाम नकार देते. ती भावाला बजावते, 'लक्षात ठेव, मी कधीही त्या नागोजीशी लग्न करणार नाही. तू पदराला गाठ बांधून ठेव', या कादंबरीस वारणेच्या खोऱ्यातील स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी आहे. इंग्रजी साम्राज्य उलथवून टाकण्यासाठी घरावर तुळशीपत्र ठेवून बाहेर पडलेल्या हिंदूरावची ती कहाणी आहे. मंगला देशासाठी बलिदान देण्यासाठी निघालेल्या हिंदूरावशी लग्न करते. सैनिकांनी वेढले असताना हिंदूरावाच्या बरोबरीने हातात बंदूक व गळ्यात काडतुसाची माळ घालून लढा देते. लढता लढता काडतुसे संपतात, तेव्हा दोघेही काडतुसांनी एकमेकांना गोळ्या घालून बलिदान देतात. स्त्री जशी कोमल, मृदू व दयाळू आहे तशीच ती निश्चयी, कठोर व पराक्रमी आहे, हे ते कादंबरीतून सांगतात.

अण्णाभाऊंची 'आवडी' ही एक सत्यकथा आहे. ती तांदूळवाडीत घडलेली कथा आहे. आवडीच्या प्रस्तावनेत अण्णा भाऊ म्हणतात, 'माझी माणसं मला कुठंना कुठं भेटलेली असतात. त्यांचे जगणं, मरणं मला ठाऊक असते. आवडीचे प्रेत गोरीतून काढले, तेव्हा मी गोरीजवळ हजर होतो. प्रचंड देहाचा धनाजी काखेत लुगडे, चोळी घेऊन रडत होता. त्याला आवडीची एक चेपली मिळाली. तेव्हा

तो लहान मुलासारखा रडू लागला. त्या प्रसंगाचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. आवडीचं जीवन माझ्या प्रतिभेत एकरूप झाले.'

आवडी ही कादंबरी ग्रामीण कुटुंबामध्ये स्त्रियांच्या सुखस्वप्नाचा कसा चुराडा होतो, हे दाखवते. आवडीची लग्नामध्ये फसवणूक होते. तिच्या नवऱ्याला फेफरं येत असलेलं तिचा भाऊ नागोजी तिच्यापासून लपवून ठेवतो. सासरी जेव्हा तिला कळतं, त्यावेळी तिचं मन दुःखानं होरपळून जातं. भावानं मला फसवलं याचं शल्य तिला सतत बोचत राहतं. तिच्या सासरी येणाऱ्या धनाजी रामोशावर तिचं प्रेम बसतं व ती त्याच्यासोबत पळून जाते. सुखाचा संसार करीत असते. आवडीचं हे बंड अभूतपूर्व आहे. धनाजी तिच्यावर जिवापाड प्रेम करतो व गावाविरुद्ध लढण्यास तयार होतो. आवडीचा सख्खा भाऊ नागोजी सुडानं पेटून उठतो व दगाबाजीनं तिचा खून करतो. नागोजी बारा वर्षांची सजा भोगून तुरूंगातून बाहेर येतो, तेव्हा त्याला कुणीही आसरा देत नाही. तो धनाजीच्या भीतीने सतत पळत असतो. सर्वजण नागोजीस तू गैर वागलास म्हणून हिणवतात. त्याला त्याचं जगणं असहाय होतं. ज्या जागी त्यानं आवडीला ठार मारलं होतं, त्याच जागी धनाजी त्याचं शीर धडापासून वेगळं करतो. अण्णा भाऊंची ही कादंबरी प्रेमविवाहाचं एक उत्तम उदाहरण आहे. स्त्री ही या समाजव्यवस्थेत वर्षानुवर्षे कुजत पडलेली असली तरी तिलाही एक मन आहे व तीही एक माणूस आहे हे अण्णाभाऊ सांगतात.

अण्णाभाऊंनी आपल्या कथालेखनात आजवर मराठी साहित्यात न अवतरलेल्या जातिवंत, रगदार, दिलदार तितकाच दमदार, बाभळीच्या झाडासारखा दणकट माणूस रसिक वाचकांसमोर प्रथमच उभा केला आहे. अण्णाभाऊंची कथा लोकमानसात रूजून मराठी वाङ्मवामध्ये तिने आपले स्थान पक्के केलेले दिसते. रुढी परंपरागत कथालेखनापेक्षा अण्णाभाऊंची कथालेखनाची रीत वेगळी आहे. त्यांच्या कथालेखनामध्ये फडक्यांच्या किंवा नवकथाकारांच्या कथामूल्यांची किंवा त्यांच्या लेखनकोशल्याची कुठेही छाप दिसून येत नाही. अण्णाभाऊंची कथा ही गोष्ट, दीर्घकथा, कहाणी आहे की लहान कादंबरी आहे, या प्रश्नाचे उत्तर देणे फार अवघड आहे. असे असले तरी त्यांची कथा दीर्घकथेत बसते, कादंबरीत बसते. लघुकथेत बसते, कहाणीत बसते. अण्णाभाऊंची कथा आशयदृष्ट्या, विषयदृष्ट्या, अनुभवाने आणि संघर्ष विषयाने नटलेली आहे. अण्णाभाऊंचे अभ्यासक डॉ.बाबूराव गुरव अण्णाभाऊंच्याकथेबाबत लिहितात, "पाणी नसणाच्या वैराण वाळवंटात कातळ खडकावर स्वसंरक्षणाचे टणक सामर्थ्य घेऊन टरारून फुलेल्या निवडुंग बनाने आपले रसाळ फळ दाखवून वेड लावावे.

काटे, बोचरी कूस मान्य करूनही सामान्य वाचकाने मोहित होऊन त्याकडे आकर्षित व्हावे आणि समीक्षकाने मात्र विज्ञान महाविद्यालयाच्या बागेतील अथवा बंगल्यासमोरील बागेतील माळ्याप्रमाणे आपली टीकेची कात्री घेऊन या निवडूंगबनाची छाटणी कोठून सुरू करावी अशा

विवंचनेत पडावे, समीक्षेच्या इंचा-फुटाच्या मापनातच गडबडून जाऊन साहित्य सौंदर्यग्रहणाचे समीक्षकाचे बळच निकामे व्हावे अशी काहीशी विचित्र अवस्था अण्णाभाऊंच्या कथेकडे वर्तमान मराठी समीक्षेच्या फुटपट्ट्या घेऊन गेल्यास झाल्यावाचून राहणार नाही. महापूर आलेली नदी उदंडपणे धावते आणि नंतर किनारा तथार होतो. अण्णाभाऊसारख्या प्रभावी प्रतिभावंत लोकसाहित्यिकाचे लेखन ही असेच महापुरासारखे असते. त्यांचा लेखनपुर, विद्रुप, विकृत न करता आपल्या समीक्षेच्या किनारपट्टया निर्माण करण्यातच खरेखुरे सौंदर्यग्रहण असते. या महापुराचाही स्वतःला श्रेष्ठ साहित्य मानावे असे फारसा आग्रह नसतोच मुळी. त्यामुळे त्यांच्या लेखनवेभवाला अवलोकनापूर्वीच, आकृतीप्रकृतीची नियमावली न दाखवता या वाङ्मयाचे अवलोकन केले तरच या कथावाङ्मवातील खरेखुरे भाववैभव, आगळेपण आपल्या नजरेत भरनार आहे.

वैजयंता ही कादंबरी तमाशातल्या कलावंताच्या जीवनावर आधारीत आहे. वैजयंता ही फक्त एकदाच आईच्या हट्टापायी तमाशात नाचते; पण तिच्या जीवनाचा तमाशा होतो. थिएटरचा मालक बाबालाल तिचा सत्कार करतो, पण त्याचा मुलगा चंदूलाल तिच्या मागे लागतो. तिचे उमावर प्रेम असते. वैजयंताने तमाशात नाचणे उमाला आवडलेले नसतं. तो तिच्यावर नाराज होतो. इकडे वैजयंताला मिळवण्यासठी चंदूलाल अनेक प्रकारचे प्रयत्न करतो, पण त्याला जेलमध्ये जावे लागते. वैजयंता तमाशात नाचणारी स्त्री असली, तरी ती शीलवान आहे. चारित्र्याला जिवापाड जपणारी आहे. चंदूलालचा नोकर बळी जेव्हा घडी मोडण्याची भाषा करतो, तेव्हा वैजयंता त्याला धमकावते, 'जीभ सैल झालीय, मग आवरा, नाही तर रंडकी होईल. एक दात उरणार नाही.' वैजयंताला तमाशा कलावंताविषयी लोकांच्या मनात जो समज होता, तो मान्य नव्हता. आपलं शील, अब्रू जपणाऱ्या स्त्रीची ती एक यशोगाथा आहे.

'चिखलातील कमळ' ही मुरळीच्या जीवनावरची कादंबरी आहे. मुरळीची मुलगी म्हणून मुरळीचे जीवन जगणारी सीता ही बळीवर प्रेम करते. ती सुंदर असल्यामुळे अनेकजण तिच्यासाठी झुरणीला लागतात; पण ती आपल्या प्रेमाला दगा देत नाही. तिचा जन्म झाल्यानंतर तिच्या आईने तिचे खंडोबासोबत लग्न लावलं होतं. ती आईला विचारते, ज्या देवाचं आईशी लग्न होतं त्याच देवाचे तिच्या मुलीशी होऊ शकतं का? ती देवाची हक्काची बायको इरते, तर मग तिच्या मनाची तृप्ती कशी होणार', अशा विचारांनी सीता गोंधळून जाते पण ती शेवटी बळीसोबतच लग्न करते व चालत आलेली प्रथा मोडते. अण्णा भाऊंच्या लिखाणाचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या अंतःकरणात स्त्रीविषयी असलेले अपार प्रेम होय. स्त्रीचे दुःख त्यांच्या मनात घर करते व

ते निवारण्यासाठी त्यांची लेखनी पुढे सरसावते. अण्णा भाऊ स्त्रियांची दुःखं मांडत असताना ते लोकांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करतात. प्रश्नांची मांडणी व त्यांची उकल ही अण्णाभाऊंच्या लेखनाची हातोटी होती. त्यांच्या कादंबरीमधल्या स्त्रियांचे जग उपेक्षित आहे. अनेक समस्यांनी घेरलेले आहे. समस्या सोडविण्याच्या वाटा तुंबलेल्या आहेत. स्त्रियांच्या जीवनास पारंपरिक दोरानी आवळून बांधून, जखडून टाकलेले आहे. याही परिस्थितीत त्या डगमगत नाहीत. मनातला निर्धार कृतीतून सिद्ध करतात. त्या स्वतः उद्ध्वस्त झाल्या तरी इतरांना जगवतात, जगणाऱ्या माणसांच्या त्या कथा आहेत. अण्णा भाऊंचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन अतिशय मोलाचा आहे. अण्णा भाऊ कादंबरीतल्या कोणत्याही पात्रास विकृत करीत नाहीत. त्यात स्त्री पात्राला तर मुळीच नाही. त्यांची प्रत्येक नायिका ही प्रचंड कष्ट करणारी, त्रास सोसणारी, जीवावर उदार होऊन जगणारी आहे. ती फाटकी, तुटकी असली तरी स्वातंत्र्याच्या व स्वाभिमानाच्या प्रेरणांनी भारावून गेलेली आहे. अण्णा भाऊ स्त्रीची लाज राखण्याकरीता व तिची शान वाढविण्याकरीता धडपडतात, झिजतात व लिहितात, यातच अण्णा भाऊंचे मोठेपण आहे.